(सदर साक्षीदार क्र.२२ नामे रुद्र नंदकिशोर प्रसाद दत्त हा जिल्हा व सत्र न्यायालय, सिवान (बिहार राज्य ) येथे व्ही.सी. द्वारे हजर असुन त्यांचा पुरावा व्ही.सी.द्वारे नोंदवण्यात येत आहे. तेथील व्ही.सी. रुममध्ये सदर साक्षीदार व कॉर्डीनेटर हजर असुन सदर पुरावा हा गुगलमिट सॉफटवेअरद्वारे नोंदवण्यात येत आहे व सदर व्ही.सी. रुममध्ये साक्षीदार आणि कॉर्डीनेटर यांच्या व्यतिरीक्त कुणीही हजर नसल्याबाबत खात्री केली आहे. तसेच सदर व्हीडीओ व ऑडीओ क्वॉलीटी क्लीअर असुन कनेक्टीव्ही संदर्भात काहीही अडचण दिसुन येत नाही.)

**<u>शपथेवर उर्वरीत उलटतपास आरोपीकरीता विधीज्ञ श्री.ए.पी.रोकडे यांच्यामार्फतः</u>**

प्रश्न- ज्यावेळी तुम्ही कामास होते त्यावेळी वडझीरे शाखेतील कॅशीयर बोरुडे यांची तुम्ही तुमच्या ऑफीसकडे बदली केली होती की त्यांचे प्रमोशन झाले होते?

उत्तर- मी ज्यावेळी आलो त्यावेळी ते सस्पेंड होते.

कॅशीयर बोरुडे यांना मी माझ्या आदेशाने सस्पेंड केले नव्हते. कॅशीयर बोरुडे यास काय कारणामुळे सस्पेंड केले होते हे मला सांगता येणार नाही. हे मला सांगता येणार नाही की बॅंक कामातील दिरंगाईमुळे त्यांना सस्पेंड केले होते किंवा कसे. हे मला सांगता येणार नाही की वडझीरे शाखेतील फ्रॉडबाबत कॅशीयर बोरुडे जबाबदार होता व त्यामुळे त्याला सस्पेंड केले होते. हे म्हणणे खरे आहे की बॅंक कर्मचा-यांची युनियन आहे.

प्रश्न- कॅशीयर बोरुडे हा वडझीरे शाखेतील फ्रॉडबाबत जबाबदार असताना त्याला सस्पेंड केल्यावर त्यानंतर बॅंक कर्मचारी युनियनची मिटींग झाली व त्यानंतर कॅशीयर बोरुडे यास पुन्हा सेवेत रिजॉइन करुन घेतले?

उत्तर- हे मला सांगता येणार नाही.

हे मला माहीती नाही की कॅशीयर बोरुडे यांना बॅंकेने रिजॉइन करुन घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की कॅशीयर बोरुडे यास सस्पेंड केल्यावर त्यास रिजॉइन करुन घेतल्याचे मला माहीत असतांनाही मी मुद्दाम मला माहीत नसल्याचे सांगत आहे. घटनेवेळी वडझीरे शाखेत सी.सी.टी.व्ही.कॅमेरे होते किंवा कसे हे मला आठवत नाही.

यांनी त्यांच्या अर्जात विद्या मॅडम, कॅशीयर बोरुडे व श्री. उघडे यांचे नाव आरोपीसोबत घेतले होते. मी सांगतो की मला त्यांचा अर्ज पाहुन सांगावे लागेल. हे म्हणणे खरे नाही की ते ११ तक्रारी अर्जामध्ये खातेदारांनी बँक स्टाफ व बँक अधिका-यांची नावे घेतली असतांनाही मी मुद्दाम पोलीसांना ते तक्रारी अर्ज दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की मी पोलीसांना ते ११ तक्रारी अर्ज दिल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की बँक स्टाफच्या परवानगीशिवाय बँक करस्पॉंडंड काउंटरच्या आत जावु शकत नाही.

प्रश्न- एखादा बँक करस्पॉडंट २/३ वर्षात २ किंवा ३ खातेदारांसंदर्भातच फ्रॉड करु शकतो मात्र २/३ वर्षात ब-याच खातेदारांसंदर्भात फ्रॉड बँक स्टाफच्या मदतीशिवाय होत नाही?

उत्तर- हे मला सांगता येणार नाही.

हे मला सांगता येणार नाही की बँक स्टाफ बँक करस्पॉडंटच्या नावाचा गैरवापर करुन खातेदारास फसवु शकतो किंवा कसे. मी सांगतो की हा चौकशी करणा-या टीमचा भाग आहे. हे मला सांगता येणार नाही की बँक करस्पॉडंट बँक स्टाफच्या नावाचा गैरवापर करुन खातेदारांना फसवु शकतो किंवा कसे.

प्रश्न- बँक स्टाफच्या गैरहजेरीत बँक करस्पॉंडंट त्यांचा आयडी, पासवर्ड आणि थम्ब इंप्रेशन याचा वापर किंवा गैरवापर करु शकतो का?

उत्तर- याची शक्यता असु शकते.

प्रश्न- बायोमेट्रीक सिस्टममध्ये बँक करस्पॉडंटचा थम्ब इंप्रेशन घेता येत होताका

उत्तर- त्यावेळी बायोमेट्रीक सिस्टम नसावी. आता बायोमेट्रीक सिस्टम टेक्नोलॉजी कोणती आहे व इनोव्हेशन काय आहे यावर अवलंबुन असेल. मी त्याबाबत सांगु शकत नाही.

प्रश्न- आताच्या काळात कॉम्प्युटर सेटअप चालु करण्यासाठी बँक करस्पॉंडंटचा थम्ब इंप्रशेन बायोमेट्रीकवर चालेलका

उत्तर- त्याबाबत मला एवढी माहीती नाही. आता बायोमेट्रीकमध्ये बरेच बदल झाले असतील.

प्रश्न- जर तुम्ही तुमच्या बँकेतील सिस्टममध्ये तुमचा लॉगइन आयडी व पासवर्ड

प्रश्न– तुम्ही व तुमच्या टीमने केलेल्या चौकशीमध्ये बँक करस्पॉडंटचा कोड दिसला नाही व बँक करस्पॉंडंटचा सहभाग दिसला नाही?

उत्तर– बँक करस्पॉडंटचा सहभाग होता. बँक करस्पॉडंट कोड डॉक्युमेंटेड नाही.

प्रश्न– बँक करस्पॉडंट हा त्याच्या स्वतःच्या कोडवरुन झालेल्या व्यवहारासाठीच जबाबदार असेल?

उत्तर– हा प्रश्न माझ्या पुरवणी जबाबाच्या बाहेर असल्याने मी त्याबाबत सांगु शकत नाही.

उलटतपास आरोपीच्या वकीलांच्या विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकुब.

| रिमोट पॉइंट कॉर्डीनेटर | साक्षीदार | संबंधीत न्यायदंडाधीकारी यांची सही |
|---|---|---|
| | | NILESH SHRIPAL SABNIS Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS Date: 2026.02.23 17:09:27 +0530 |
| Radheshyam Kumar | | |
| राधेशाम कुमार | रुद्र नंदकिशोर प्रसाद दत्त | (डॉ.एन.एस.सबनीस) |
| सिस्टम ऑफीसर, | | न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, |
| सिवान कोर्ट, राज्य बिहार. | | कोर्ट नं.२, पारनेर. |
| | | दि. २३/०२/२०२६ |

श्रवणोत्तर स्वीकृती

NILESH SHRIPAL SABNIS Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS Date: 2026.02.23 17:09:38 +0530

दिनांकः २३/०२/२०२६.

(डॉ.एन.एस.सबनीस)

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२, पारनेर.

भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA

AADHAAR



Rudra Datt

1981-01-27

Male

xxxxxxxx2589

23/Feb/26 (Submitted to Civil Court Siwan).

Address:

301, Decent Apartments, SPBTC Quarters, Sant Gyaneshwar Road, Adani Power, JVPD, Mumbai, Vileparle (West), Mumbai Suburban, Maharashtra, 400056

Powered by DigiLocker

Tap to Zoom

मेरा आधार, मेरी पहचान